# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** हिंगोली **P.S.(ठाणे):** हिंगोली शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0740 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/10/2024 20:22

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 29/10/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 29/10/2024
**Time From (वेळेपासून):** 13:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/10/2024 **Time (वेळ):** 20:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 023
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/10/2024 20:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** रेल्वे स्टेशन रोड,सरस्वती नगर,तलाठी सज्जा बळसोंड कार्यालयाचे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री भास्कर रामराव पतंगे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1965

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आदर्श कलेनी, हिंगोली,हिंगोली,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आदर्श कलेनी, हिंगोली,हिंगोली,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7588153810

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विजय भ वत सोमटकर | | | 1. तलाठी, हिंगोली सज्जा बळसोंड, लाला लजपतराय नगर, हिंगोली,हिंगोली,हिंगोली, महाराष्ट्र,भारत |
| 2 | जयंत क्रष्णराव देशमुख | | | 1. रामाकष्ण सिटी, आरकेस्कुल जवळ,हिंगोली,हिंगोली,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ आकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

ला.प्र.वि.कार्यालय, हिंगोली

दिनांक:- 29.10.2024

फिर्याद

मी, श्री भास्कर रामराव पतंगे, वय 59 वर्ष, व्यवसाय सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता, जलसंपदा विभाग हिंगोली रा. आदर्श कॉलनी, हिंगोली मो.क्र. 7588153810

समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी दिनांक 28.10.2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली येथे श्री विकास घनवट, पोलीस उप अधिक्षक, यांचेकडे लेखी तक्रार दिली होती की, माझे नावे दिनांक 18.02.2010 रोजी नोंदणी दस्त क्रमांक हगल 799/2010 अन्वये मी मौजे बळसोंड, ता. जि. हिंगोली येथील शेत गट क्रमांक 96 मधील प्लॉट क्रमांक 18/1 खरेदी खताव्दारे खरेदी केलेला आहे. सदर प्लॉटची नोंद 7/12 उता-यावर घेतलेली नाही. सध्या प्लॉट विक्री साठी 7/12 उता-याचे नोंदीची आवश्यकता असल्याने सदर प्लाटची खरेदी खतावरून माझे नावाची 7/12 वर नोंद घेण्यासाठी दिनांक 16.02.2024 रोजी मी तलाठी सज्जा बळसोंड येथे रितसर अर्ज दाखल केलेला आहे.

त्यानंतर बरेच दिवस झाल्यानंतरही माझे प्लॉटची फेरफार नोंदीचे काम झाले नसल्याने मी तहसील कार्यालय हिंगोली व उप विभागीय अधिकारी, कार्यालय हिंगोली येथे दि.01.07.2024 रोजी लेखी तक्रार केली होती. त्यावरून सुनावणी होवुन माझे नावाची नियमानुसार फेरफार नोंद घेणे बाबत मा. उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांनी दि. 01.10.2024 रोजी तलाठी सज्जा बळसोंड यांना आदेश दिलेला आहे.

त्यानंतर मी सदर आदेशाची प्रत घेवून तलाठी सज्जा बळसोंड यांचे कार्यालयात दिनांक 25.10.2024 रोजी गेलो असता तेथील तलाठी श्री सोमटकर यांनी माझे प्लॉटची 7/12 उता-यावर माझे नावाची नोंद घेण्यासाठी माझ्याकडे 50,000/- रूपयाची मागणी केली होती. त्यावरुन मी दिनांक 28.10.2024 रोजी ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली येथे त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही करावी अशी तक्रार दिली होती.

त्यानंतर ला.प्र.वि कार्यालय हिंगोली येथील पोलीस उप अधिक्षक श्री विकास घनवट यांनी शासकिय कार्यालयातुन दोन पंच नामे श्री संदीप खोब्राजी ढेंबरे, वनरक्षक, फिरते पथक हिंगोली वनविभाग, हिंगोली व श्री सुधाकर माणिकराव क-हाळे, वनरक्षक, वनपरीक्षेत्र अधिकारी, सेनगांव यांना बोलावुन घेवून त्यांना माझा व मला त्यांचा परीचय करून दिला व मी दिलेली लेखी तक्रार त्यांना वाचुन दाखविण्यात आली होती.

त्यानंतर दिनांक 28.10.2024 रोजी करण्यात आलेल्या तक्रार पडताळणी कार्यवाही दरम्यान मी पंच क्र.1 श्री संदीप ढेंबरे यांचेसह सोमटकर तलाठी, यांची भेट घेण्याकरीता तलाठी सज्जा बळसोंड कार्यालय,रेल्वे स्टेशन रोड, सरस्वती नगर, हिंगोली येथे गेलो असता तेथे सोमटकर तलाठी यांची भेट झाली. तेव्हा माझे कामासंबधी बोलणी करीत असतांना माझे नावाच्या प्लॉटची 7/12 वर नोंद करण्यासाठी तलाठी सोमटकर यांनी स्वतः व तेथे हजर असणारे खाजगी इसम जयंतराव देशमुख यांचे मार्फतिने स्वतःसाठी 50,000/- रू लाचेची मागणी करून लाचेची रक्कम जयंत देशमुख यांचे मार्फतिने स्वतःसाठी स्विकारणार असल्याबाबत सहमती दर्शविली आहे.

त्यावरून दिनांक 29.10.2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली येथे सापळा पुर्व कार्यवाही

करण्यात आली. त्यानंतर मी लाच म्हणून देण्यासाठी आणलेले 50,000/- रू. ( ज्यामध्ये 500/- रू.दराच्या 100 नोटा) चे नंबर व वर्णन एका कागदावर टंकलिखित करण्यात आले होते. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री विकास घनवट यांनी अँन्थ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहिती देवून त्याचे प्रात्यक्षिक त्यांचे कार्यालयातील सपोउपनि युनुस शेख यांचे करवी करून दाखविले व लाच म्हणून द्यावयाच्या नोटांना दोन्ही बाजुने अँन्थ्रॉसीन पावडर लावली. त्यानंतर लाच स्विकारल्या नंतर करावयाचा ईशा-या बाबत पोलीस उप अधिक्षक श्री विकास घनवट यांनी मला व पंच, सापळा पथकातील सर्व सदस्यांना योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर दिनांक 29.10.2024 रोजी मी आणि पंच क्रमांक 1 व सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे सोमटकर तलाठी व जयंत देशमुख यांना भेटण्यासाठी तलाठी सज्जा बळसोंड यांचे कार्यालयाकडे रवाना झालो. तेव्हा माझी सोमटकर तलाठी व जयंत देशमुख यांची तलाठी सज्जा बळसोंड कार्यालयाचे समोर रोडवर भेट झाली. तेव्हा जयंत देशमुख यांनी लाचेची रक्कम 50,000/- रू त्यांचे जवळ असणा-या काळे रंगाचे बॅगमध्ये तलाठी सोमटकर यांचे समक्ष राहु द्या माझे बॅगमध्ये द्या असे म्हणुन त्यांचे डाव्या हाताने स्वीकारून त्यांचे जवळील बॅगमध्ये ठेवली. त्यावरून मी सापळा पथकास लाच स्विकाल्याचा ईशारा केला. त्यावेळी खाजगी इसम देशमुख त्यांचे जवळील मोटर सायकलने पुढे निघुन गेले असता सापळा पथकाने हजर असलेले तलाठी सोमटकर यांना 13.15 वा ताब्यात घेतले तेव्हा पोलीस उपअधीक्षक घनवट यांनी मला लाचेची रक्कम कोणी मागीतली व कोणी स्विकारली असे विचारले तेव्हा खाजगी इसम देशमुख यांनी तलाठी सोमटकर यांचे समक्ष लाचेची रक्कम स्विकारून त्यांचे जवळील बॅगमध्ये ठेवुन ते मोटर सायकलने पुढे निघुन गेले असे सांगीतले. त्यावेळी श्री विकास घनवट पोलीस उपअधीक्षक यांनी तलाठी सोमटकर यांना त्यांचे मोबाईलवरून खाजगी इसम देशमुख यांना फोन करून कुठे आहेत याबाबत विचारले असता त्यांनी रामाकृष्णा सिटी, आर.के. शाळेजवळ बळसोंड येथे असल्याचे सांगीतले त्यावरून मी, सापळा पथक व तलाठी सोमटकर असे रामाकृष्णा सिटी येथे जावुन खाजगी इसम देशमुख यांना ताब्यात घेवुन तलाठी सज्जा बळसोंड येथे आलो व त्यांचेकडुन लाचेची रक्कम 50,000/-रू. पंचासमक्ष जप्त केली. त्यानंतर विजय सोमटकर तलाठी व जयंत देशमुख यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले आहे.

तसेच पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान माझे, विजय सोमटकर तलाठी व जयंत देशमुख यांचेशी प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेले संभाषण हे व्हाईस रेकॉर्डरद्वारे मेमरी कार्डमधे रेकॉर्ड करण्यात आले आहे.

तरी लोकसेवक विजय भागवत सोमटकर, वय 42 वर्ष, व्यवसाय नौकरी, पद-तलाठी, सज्जा बळसोंड, रा. लाला लजपतराय नगर, हिंगोली यांनी त्याचे पदाचा दुरूपयोग करून त्यांना मिळणारे परिश्रमिका खेरीज 50,000/- रू स्वतः व खाजगी इसम जयंतराव देशमुख यांचे मार्फतिने स्वतःसाठी लाचेची मागणी करून 50,000 /- रू लाचेची रक्कम जयंत कृष्णराव देशमुख वय 59 वर्ष, रा. रामाकृष्ण सिटी,आर.के.स्कुल जवळ, ता.जि.हिंगोली यांनी तलाठी सोमटकर यांचे समक्ष तलाठी कार्यालय बळसोंडचे समोरील रोडवर दिनांक 29/10/2024 रोजी 13.15 वा. स्विकारली म्हणुन त्यांचे विरूध्द योग्य ती कायदेशिर कार्यवाही करण्यात यावी म्हणून मी फिर्याद देत आहे.

माझी वरील फिर्याद मी सापळा कार्यवाही झाल्यानंतर ला.प्र.वि. कार्यालय, हिंगोली येथे आज दिनांक 29.10.2024 रोजी पोलीस उप अधिक्षक श्री विकास घनवट यांना तोंडी सांगितली असून ती संगणकावर टंकलिखित केली असून माझे वरील फिर्यादीची प्रींट काढल्यावर मी माझी फिर्याद वाचून पाहिली असून ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

सही -

(विकास घनवट)
भास्कर रामराव पतंगे
अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली.

पोलीस उप अधिक्षक

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
VINAYAK DEVIDASRAO JADHAV
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): 15101000402VDJ
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठविल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): narendra bhimrao p
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 50686

पोलीस ठाणे अंमलदार
पो. स्टे. हिंगोली (शहर)